# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष ११ | अंक १ | जानेवारी २०२६ | मूल्य ₹ १०० | AED 10 | USD 2 | www.panthastha.com




Dr. Anant Sardeshmukh



Prof. Dr. Devidas Golhar



Centre for Innovation, Incubation & Linkages

Savitribai Phule Pune University



Prof Dr. K. C. Mohite

INCUBATE PARTNERS



Dr. Sandeep Kadwe

SPPU Research Park Foundation



Prof Arvind Shaligram

Vigyan Ashram



Dr. Yogesh Kulkarni

## IICES 2026

SUSTAINABLE GROWTH

Anandghana Industries



Dr. Rupa Rawal



Gitaram Kadam

TECHNOVATORS



Dr. Shashikant Gunjal



Dr. Vikas Kandekar

Citron Life Sciences Pvt. Ltd.

First Sunday

Innovation | Interaction | Collaboration | Entrepreneurship | Sustainable Growth |

Shirur Shikshan Prasarak Mandal's

# Chandmal Tarachand Bora College, Shirur, Dist. Pune

**Arts • Commerce • Science**

Pin Code - 412210. Ph. No.: 02138-222301, Fax: 02138-224170
Email : ctborainfo68@gmail.com, Website: www.ctboracollege.edu.in
NAAC Re-Accredited with A+ Grade

## Courses Offered

Following Courses / Programs are offered by college. The College has also started UGC approved B.Voc. Degree, Diploma and Certificate Courses.

## Junior College

- **XI Arts & XII Arts** : English, Marathi, Hindi, Economics, History, Geography, Psychology
- **XI Comerece & XII Commerce** : English & Marathi Medium - Compulsory & Optional Subjects
- **XI Science & XII Science** : Physics, Chemistry, Biology, IT, Mathematics & Bifocal Subjects (Computer Science, Electronic Science, Crop Science)
- **XI H.S.C. Voc & XII H.S.C. Voc.** : Crop Science, Food Product & Technology, Marketing & Retail Management

## Senior College

### Degree Courses

- **B.A. (General Subjects)** : Marathi, Hindi, English, History, Economics, Psychology, Geography, Logic, AIHC & A
- **B.A. (Special Subjects)** : Marathi, Hindi, English, History, Economics, Psychology, Geography
- **B.Com.** : Compulsory & Optional Subjects Offered by the college as per: University Syllabus:
- **B.Sc.** : Chemistry, Physics, Botany, Geography, Mathematics
- **B.Sc. (Computer Science)** : Computer Science, Mathematics and Statistics, Electronics
- **B.Com (B.M.)** : All Compulsory Subjects as per University Syllabus
- **B.Com (C.A.)** : All Compulsory Subjects as per University Syllabus

### Post-Graduate Courses

- **M.A.** : Marathi - Part I-II
- **M.A.** : Hindi - Part I-II
- **M.A.** : English - Part I-II
- **M.A.** : History - Part I-II
- **M.A.** : Economics - Part I-II
- **M.Com.** : Part - I-II
- **M.Sc.** : Analytical Chemistry - Part I-II
- **M.Sc.** : Organic Chemistry - Part I-II
- **M.A. / M.Sc.** : Geography - Part I-II
- **M.Sc.** : Botany - Part I-II
- **M.Sc.** : Physics - Part I-II
- **M.Sc.** : Computer Science - Part I-II

### Research Centre

- **Ph.D. (Arts)** : Marathi, Hindi, English, History, Economics
- **Ph.D. (Commerce)** : Commerce
- **Ph.D. (Science)** : Physics, Chemistry, Botany

### New Courses

- **B.Voc Degree Courses** : Retail Management, Renewable Energy Resources
- **UGC approved Certificate Courses** : Fundamentals of Geoinformatics, Digital Banking. Tourism and
: Heritage Management, Advance Instrumental Technique

## Study Centre

- Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU), Nashik
- School of Open and Distance Learning Savitribai Phule Pune University, Pune

विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय - ऊर्जारंभ | - डॉ संदीप कडवे |
| २. | भारतातील उद्योजकांना संस्थात्मक उपक्रम आणि सरकारी योजना कशा फायदेशीर ठरतात | - डॉ अनंत सरदेशमुख |
| ३. | आखाती देशातून परत आल्यानंतरचे जीवन : परतणाऱ्या भारतीय कामगारांची समस्या | - दिलीप परांजपे |
| ४. | माझे परदेशी दौरे | - डॉ.के.सी. मोहिते |
| ५. | प्रवासी भारतीय दिवस | |

विश्व पांथस्थ
वर्ष ११ । अंक १
जानेवारी २०२६

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
धवल नांदेडकर, फुजेरा
देविका घोरपडे, इंदौर
डॉ.नितीन गायकवाड, औरंगाबाद

मुखपृष्ठ आणि सजावट
विश्व पांथस्थ

मूल्य ₹ 100 | AED 10 | US$2

Vishwa Panthastha
Year 11 Issue 1
January 2026

First Marathi Monthly For NRIs

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde. Abu Dhabi
Dhawal Nandedkar, Fujerah
Devika Ghorpade - Indore
Dr. NitinGaikwad-Aurangbad

Cover & Design
VISHWA PANTHASTHA

Price ₹ 100 | AED 10 | US$2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी -२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७. येथे प्रसिध्द केले.
**संपादक - संदीप वसंतराव कडवे**
**(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)**

Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe. and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)

या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



# ऊर्जारंभ

**- डॉ. संदीप कडवे**

२०२६ नववर्षाचे स्वागत करतांना हा विशेषांक तुमच्या हाती देतांना आनंद होत आहे. विश्व पांथस्थ हा मंच अनिवासी भारतीयांसाठी आहेच, त्यांचे विविध प्रश्न आपण मांडतोच. परंतु वर्षभर अनेक सोशल इम्पॅक्ट प्रोजेक्ट्स वर विश्व पांथस्थ काम करत असतो. First Sunday हा सोशल इम्पॅक्ट उपक्रम २०२१ पासून चालू आहे. पुणे युनिव्हर्सिटीचे इन्क्युबेशन सेंटर, सी टी बोरा कॉलेज, शिरूर, फर्स्ट संडे, टेकनोव्हेटर्स आणि इन्क्युबेट पार्टनर्स पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सी टी बोरा कॉलेज शिरूर येथे IICES २०२६एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. Innovation, Interaction, Collaboration, Entrepreneurship and Sustainable Growth हा मुख्य विषय या एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.के.सी.मोहीते यांच्या नेतृत्वात होत असलेल्या या कार्यशाळेसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित असणार आहेत. त्यानिमित्ताने एक प्रदर्शन देखील भरवण्यात येणार आहे. पुण्यातील व शिरूर परिसरातील एक हजारापेक्षा जास्त नागरिक या प्रदर्शनाला भेट देऊन स्टार्टअप, उद्योजकता, संशोधन, बिझनेस आणि सेवा क्षेत्र यामध्ये काम करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देतील अशी अपेक्षा आहे. यानंतर सायंकाळी जवळच्या एका शेतावर कृषी पर्यटनास प्रोत्साहन म्हणून मुक्काम करून दुसऱ्या दिवशी पाबळ येथील विज्ञान आश्रम येथे भेट देण्यात येणार आहे. एका दृष्टीने IIECS -२०२६ हा नववर्षाचा ऊर्जारंभ असणार आहे, त्यासाठी सर्व मान्यवर निमंत्रित व सहभागी होणारे विद्यार्थी, उद्योजक, प्राध्यापक, शिक्षक, नागरिक, गुंतवकणूकदार, संयोजक संस्था आणि संलग्न सर्व संस्था यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा !!

Sustainability अर्थात शाश्वत विकास याचे महत्व अधोरेखित करणे, जागरूकता निर्माण करणे हा उद्देश आहेच. परंतु याचबरोबर यातील विविध प्रकल्प आखणी करून एकमेकांबरोबर काम करून ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सतत प्रयत्न करणे हा या सर्व उपक्रमांचा उद्देश आहे. हि सकारात्मकता रुजावी यासाठी हा प्रयत्न आहे.

शाश्वत विकास अर्थात Sustainable Growth याला अनेक प्रकारे समजून घ्यावे लागेल.

माझ्या मते आजच्या विश्वाची सरळ सरळ दोन भागात विभागणी झाली आहे. एक विश्व हे नैसर्गिक रित्या विकसित होते, नष्ट होते आणि निसर्गात उपलब्ध असलेल्या ऊर्जास्रोतांवर ते जगते. हे विश्व लाखो वर्ष अस्तित्वात आहे, अस्तित्वात राहील. दुसरे विश्व मानवनिर्मित आहे. ते मानवनिर्मित ऊर्जा स्तोत्रांवर आधारित आहे. विद्युत पुरवठा बंद झाला तर हे विश्व कोलमडेल. विश्वाचे वय लक्षात घेता हे मानवनिर्मित विश्व नुकतेच जन्माला आले आहे. परंतु, या मानवनिर्मित विश्वाने नैसर्गिक विश्वावर अतिक्रमण करून धोका निर्माण केला आहे. पृथ्वीचा विचार करता पृथ्वीवरच्या सर्व जीवांना निसर्गाला धोका निर्माण करण्याचे काम हे मानव विश्व करते आहे. समतोल ढळतो आहे. त्यामुळे शाश्वतता कशी राहील याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सर्वच ठिकाणी डिप्रेसिएशन आहे, घट आहे, घसारा आहे, किंवा प्रत्येक क्षणी प्रत्येक जिवंत प्राणी, वस्तू, यंत्रणा किंवा निसर्ग हा

थोडा थोडा मृत पावत असतो. त्याच वेळी नैसर्गिकरित्या त्याच प्राणी, वस्तू, यंत्रणा किंवा निसर्ग याची नैसर्गिकरित्या अथवा इतर प्रयत्नांनी निर्मिती होत असते. जेव्हा नैसर्गिक विनाशाचा दर हा नैसर्गिक सृजनाच्या किंवा निर्मितीच्या दरापेक्षा कमी असतो, तेव्हा शाश्वत विकास होत आहे असे म्हणता येईल. माझ्या दृष्टीने हीच शाश्वत विकासाची मूळ व्याख्या आहे.

शाश्वत विकास होत असतांना पूर्वीच्या प्राणी, वस्तू, यंत्रणा अथवा निसर्ग यांच्यात नैसर्गिक पद्धतीने जगण्यास लायक रीतीने बदल होत असतो. तो चांगला का वाईट हे काळ ठरवते. परंतु हे सगळे फक्त नैसर्गिक रीतीने होत असेल तेव्हा.

आता मात्र अतिरेकी मानवी हस्तक्षेपामुळे या प्राण्यांचे, वस्तूंचे, यंत्रणेचे अथवा निसर्गाचे प्रचंड विषम प्रमाणात दोहन केले जात आहे, अर्थात विनाशाचा दर हा सृजनाच्या अथवा पुनर्निर्मितीच्या दरापेक्षा कितीतरी जास्त आहे. म्हणून सर्वच ठिकाणी आपल्याला अशाश्वतता दिसते आहे.

एक उदाहरण घेऊ. तपोवन नासिक इथे १८०० झाडे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तोडली जाणार आहेत. हा विनाश आहे. हि १८०० झाडे रुजून वाढून या स्थितीत येण्यासाठी कित्येक दशके गेली आहेत. किंवा कित्येक वर्षे गेली आहेत. या झाडांमुळे तिथे आपल्याला जाणवेल अशी किंवा न जाणवणारी जीवसृष्टी व जीवांची साखळी तयार झाली आहे. १८०० झाडांबरोबर त्याचाही विनाश होणार आहे. आता कुणी म्हणत असेल कि हि झाडे तोडणार म्हणून आम्ही १८००० झाडे लावू, तर ते विधान केवळ दिशाभूल करणारे, बाळबोध आहे. याचे कारण म्हणजे कुणी झाडे लावू शकत नाही, रोपे लावतात. त्याची झाडे अनेक वर्षांनी तयार होतात. त्या १८००० मधील किती रोपे जागून त्याची झाडे होतील याची शाश्वती नाही. शिवाय जी जीवसृष्टी या प्रक्रियेत तयार होणार आहे, त्याची तशी च्या तशी पुनर्निर्मिती होईल याचीही खात्री नाही. जे नष्ट होणार आहे ती फक्त झाडे नाहीत, तो निसर्ग आहे. जी लावली जातील ती फक्त रोपे असतील, झाडे नाही, निसर्ग तर नाहीच नाही.

अरावली पर्वत रांगांनी आजवर दक्षिणेकडच्या भारताचे रक्षण केले, त्या पर्वत रांगांचा विध्वंस करण्याची शासकीय योजना आहे. भयंकर आहे. हा शाश्वत विकास नाही, हा शाश्वत विनाश किंवा ह्रास आहे.

माणसाच्या आयुष्यात असेच होत असते. आजची समृद्ध पिढी जे ऐश्वर्य भागात असेल तर त्यामागे त्यांच्या वाडवडिलांनी, पूर्वजांनी केलेल्या कष्टांची ती फळे असतात, त्यात प्रत्येकजण आपली काही भर टाकतो व आजीवन समृद्धता अनुभवू शकतो. ती भर पडली नाही, तर याच आयुष्यात त्या वारसाच्या नशिबी निर्धनता किंवा गरिबी येऊ शकते. त्या वारसाला मुले झालीच नाही तर कुळ पुढे चालत नाही, नष्ट होते.

बिझनेसचे देखील असेच असते. जोपर्यंत होणाऱ्या खर्चापेक्षा बिझनेसची खरी कमाई जास्त आहे, तोपर्यंतच बिझनेस sustainable अर्थात शाश्वत राहू शकतो.

समाजाचे देखील असेच आहे. जोपर्यंत समाज अनिष्ट रूढी, प्रथा टाकत राहून जगण्यास लायक अशा मूल्यांचा, व्यवस्थेचा स्वीकार, अंगीकार करत राहतो, तोपर्यंत समाज शाश्वत प्रगत राहतो. नपेक्षा तो समाज काळाच्या प्रवाहात नष्ट होतो. अनुषंगाने राज्य, देश हे देखील नष्ट होतात. समतोल ढळला कि शाश्वतता संपते. मुलींचा जन्मदर कमी झाला त्याचबरोबर मुलांना चांगल्या नोकऱ्या मिळाल्या नाहीत तर समाजात लग्न न झालेल्या मुलांची संख्या वाढते, समतोल ढळतो, प्रश्न निर्माण होतात, शाश्वतता नष्ट होते.

शाश्वतता हि मुख्यतः नैसर्गिक जैवविविधतेतून निर्माण होते. कुठल्याही यंत्रणेची शाश्वतता देखील विविधतेतूनच शक्य होते. नुकतेच एक उदाहरण आपण बघितले. इंडिगो एअर लाईन ची सेवा कोलमडली, संपूर्ण देशात हवाई अराजकता निर्माण झाली, याचे कारण म्हणजे, इंडिगो ची देशांतर्गत हवाई सेवेतील ६० टक्क्यापेक्षा जास्त मक्तेदारी. सध्या मोबाईल नेटवर्क मध्ये एअर टेल ची व जीओ ची अशीच मक्तेदारी निर्माण झाली आहे, आणि एअरटेलची आणि जीओ ची सेवा कोलमडली तर भारतीय मोबाईल

आणि इंटरनेट क्षेत्रात आणीबाणीची परिस्थिती निर्माण होईल. म्हणून पर्यायी व्यवस्थेची आत्यंतिक गरज असते. एकाधिकार असलेल्या राजकीय पक्षाला पर्याय निर्माण झाला पाहिजे, मोठ्या शहराला निमशहरी किंवा ग्रामीण भागाने पर्याय निर्माण केला पाहिजे.

Innovation मुळे हि पर्यायी, अधिक चांगली व्यवस्था, वस्तू, सेवा निर्माण करता येते. म्हणून sustainable growth साठी Innovation ही पहिली महत्वाची पायरी आहे. स्टार्ट अप उद्योजकांनी या अधिक चांगल्या, पर्यायी वस्तूंची, सेवांची, व्यवस्थेची निर्मिती करण्याचे ठरवले तर त्यात आमूलाग्र बदल घडू शकतो. हा बदलही सतत घडत राहावा लागतो. तर तो टिकतो.

या सतत होणाऱ्या प्रक्रियेसाठी नेटवर्किंग आणि संवाद फार महत्वाचा आहे. collaboration महत्वाचे आहे. Entrepreneurship महत्वाची आहे. शिक्षण महत्वाचे आहेच, पण शिक्षणाचा वापर या नवनिर्मिती साठी कसा करावा याची मानसिकता घडवण्याची देखील खूप गरज आहे. Incubate Partners तर्फे स्टार्ट अप उद्योजक, बिझनेस आणि इन्वेस्टर्स यांनी मेन्टॉरिंग आणि इन्क्युबेशन सर्विसेस दिल्या जातात. विश्व पांथस्थ, First Sunday आणि Technovators सारखे सोशल इम्पॅक्ट उपक्रम या इंटरॅक्शन नेटवर्किंग साठी महत्वाची भूमिका निभावतात, एक खुला मंच देतात. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व सी.टी.बोरा कॉलेज, शिरूर यांच्या बरोबर संयुक्तपणे IICES २०२६ चे आयोजन करून निमशहरी किंवा ग्रामीण भागातील उद्योजकांसाठी एक मोठी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. आजचा अंक हा मुख्यतः IICES २०२६ साठी विशेषांक आहे. या कार्यक्रमासाठी, परिसंवादासाठी जमलेल्या सर्व मान्यवरांना, उद्योजकांना, गुंतवणूकदारांना, विद्यार्थ्यांना, शिक्षक व प्राध्यापकांना, इंडस्ट्री प्रोफेशनल्स व अधिकाऱ्यांना या परिसंवादात भाग घेऊन शाश्वत विकासाच्या या प्रयत्नात हातभार लावल्याबद्दल शुभेच्छा, आभार व हार्दिक अभिनंदन.

नववर्षाची अशी चांगली सुरवात या अर्थाने हा एक ऊर्जारंभच आहे.

डॉ. संदीप कडवे
३ जानेवारी, २०२६
पुणे


Our best wishes for IICES 2026

ROSEFIELD ENERGY TECH

● Energy Management ● Electric Vehicles
● Sustainable Practices



Shailendra Gokhale

Our best wishes for IICES 2026

SPECTRUM ENTERPRISES

REPRESENTING

Envalior India Pvt. Ltd.
Elastron for TPE
S.C.J. Plastics Ltd.
Fine Organic Industries
Baerlocher India Additives Pvt. Ltd.



Imtiaz Lokhandwala

# भारतातील उद्योजकांना संस्थात्मक उपक्रम आणि सरकारी योजना कशा फायदेशीर ठरतात

- डॉ. अनंत सरदेशमुख



भारताच्या उद्योजकांची वाढ देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांनी अनेक योजनांचा अवलंब करून नवशिक्या आणि अनुभवी उद्योजकांना आर्थिक, तांत्रिक, आणि प्रशासनिक पाठबळ दिले आहे. या योजनांचा उद्देश व्यवसाय सुरू करणे सुलभ करणे, भांडवल उपलब्ध करणे, कौशल्ये वाढवणे आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे हा आहे. सन २०४७ पर्यंत भारताला जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आणि पूर्णपणे अतिनिर्भरता प्राप्त करूनघेण्यासाठी समृद्ध उद्योजकतेची वाटच महत्त्वाची आहे.

**१. स्टार्टअप इंडिया: नवीन कल्पनांना बळकटी**

सरकारने २०१६ मध्ये स्टार्टअप इंडिया योजना सुरू केली, ज्याअंतर्गत उद्योजकांना विविध सवलती आणि समर्थन मिळते. यात ३ वर्षांची आयकर सूट, पेटंट संशोधन प्रक्रिया जलद करण्याची सुविधा, नियमनांमध्ये स्वयं-प्रमाणन (self-certification) यांचा समावेश आहे. तसेच स्टार्टअप इंडिया सीड फंड स्कीम अंतर्गत, बीज भांडवल व इतर वित्तीय मदत मिळते ज्यातून प्रारंभीच्या टप्प्यातील संकल्पना, प्रोटोटाइप विकास आदि साठी सहाय्य उपलब्ध होते.

या योजनेमुळे भारतीय स्टार्टअप्सची संख्या झपाट्याने वाढली आहे. २०२५ मध्ये भारतात दोन लाखाहून अधिक सरकारी मान्यताप्राप्त स्टार्टअप्स झाले आहेत आणि या वर्षातच जवळपास ४४,००० नवीन स्टार्टअप्स वाढले आहेत, ज्यात सुमारे ४८% मध्ये किमान एक महिला संचालक आहे - हे उद्योजकतेमध्ये समानतेचे संकेत आहेत.

**२. स्टँड-अप इंडिया: SC/ST व महिलांना प्रोत्साहन**

स्टँड-अप इंडिया योजना विशेषतः अनुसूचित जाती/जनजाती आणि महिला उद्योजकांना विशेष लक्ष्य करते. या अंतर्गत १० लाख ते १ कोटी रुपये दरम्यान बँक कर्ज मिळते ज्यामुळे नवीन ग्रीनफिल्ड व्यवसाय सुरू करणे शक्य होते.

सरकारी आकडेवारीनुसार, या योजनेअंतर्गत २.३५ लाखाहून अधिक कर्ज दिले गेले आहेत, ज्यामुळे अनेक उद्योजकांनी व्यवसाय सुरू केला आहे.

**३. प्रधनमंत्री मुद्रा योजना (PMMY): सूक्ष्म आणि लहान उद्योगांसाठी**

मुद्रा योजना ही सूक्ष्म व लहान उद्योगांसाठी वित्तीय मदत देणारी एक महत्त्वाची योजना आहे. याअंतर्गत शिशु, किशोर, आणि तरुण असे तीन प्रकारचे कर्ज विभाग आहेत - शिशु चरणात विमान खर्चाला देखील समाविष्ट करून व्यवसाय सुरू करण्यासाठी थोडे भांडवल मिळते, तर किशोर आणि तरुण टप्प्यात व्यवसाय वाढीला पूरक निधी मिळतो.

ही योजना लहान व्यवसायांना तारण विरहित (कॉलॅटरल-फ्री) लोन मिळवून देऊन त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवते, जे व्यवसायाच्या वाढीस महत्त्वाचे ठरते.

**४. Udyam नोंदणी: MSME साठी सोपे प्रवेश आणि फायदे**

Udyam Registration हे MSME (लघु, मध्यम उद्योग) नोंदणीचे एक आधुनिक तंत्र आहे, ज्यामुळे व्यवसायांना सरकारच्या

विविध योजनांमध्ये सहज प्रवेश मिळतो. २०२४ पर्यंत ४.७७ कोटींपेक्षा अधिक MSME नोंदणीकृत झाली आहेत, ज्यामुळे या उद्योगांना योग्य कर्ज, सबसिडी, ISO प्रमाणन खर्चात सवलत आणि इतर लाभ मिळण्यास मदत झाली आहे.

या नोंदणीकृत MSME कर्जासाठी ₹१५.६ लाख कोटीपेक्षा जास्त करार सुलभ झाले असल्याचे RBI च्या अभ्यासातून कळते, ज्यामुळे लघु उद्योगांना मोठ्या व्यावसायिक संधी मिळतात.

**५. अटल इनोव्हेशन मिशन (AIM²): नवकल्पना संस्कृतीचा विस्तार**

अटल नवनिर्माण अभियान Atal Innovation Mission ही नीती आयोग (NITI Ayog) अंतर्गत एक प्रमुख उपक्रम आहे, ज्याचा उद्देश शाळा, महाविद्यालये आणि उद्योजक वर्गात समस्या-समाधानात्मक विचार साकार करणे आहे. या योजने अंतर्गत Atal Tinkering Labs आणि Atal Incubation Centres चालवले जातात, ज्यांनी ३५००+ स्टार्टअप्सना मार्गदर्शन, संसाधने आणि फंडिंग दिले आहे आणि ३२,000+ नोकऱ्यांची निर्मिती करण्यात मदत केली आहे.

सरकारच्या विविध योजनांमुळे उद्योजकांना सुरुवातीच्या अडचणींवर मात करता येत आहे - भांडवल मिळणे, कौशल्ये विकसित करणे, सल्ला आणि नेटवर्किंग मिळणे हे सगळे अधिक सहज झाले आहे. स्टार्टअप इंडिया, स्टँड-अप इंडिया, मुद्रा योजना, Udyam नोंदणी व अटल इनोव्हेशन मिशन यांसारख्या उपक्रमांनी उद्योजकांना आर्थिक आणि तांत्रिक आधार दिला आहे. या योजनांचा वापर करून उद्योजक नवकल्पना प्रभावीपणे वापरू शकतात, रोजगार वाढवू शकतात आणि भारताच्या आर्थिक विकासात सक्रिय सहभाग घेऊ शकतात.

भारत प्रगत राष्ट्र तेंव्हाच बनेल जेंव्हा भारत एक उद्यामी, उद्योजक राष्ट्र बनेल.

**डॉ. अनंत सरदेशमुख**
व्यवस्थापन, उद्योग, स्टार्टअप मार्गदर्शक.
९८२२४३६१३०
anant.sardeshmukhgmail.com

*Our best wishes for IICES 2026*

SAKSUN INDUSTRIES PVT. LTD.

Phone: +91 98812 03351 / +91 84460 03351, E-mail: saksunindustries@gmail.com
Sr. No. 152/8, Ganesh Nagar, Behind Muktai Garden,
Dhayarigaon, Pune - 411 041.
Website: www.saksunindustries.in



Navnath Sakhare

*Our best wishes for IICES 2026*

eisen
Ergonomics Remastered

EISEN ERGOTECH PVT LTD
Height Adjustable Desk Manufacturer
Gat No. 48, Shindewadi, Tal-Bhor, Dist. Pune 412205
Info@eisenergo.com, www.eisenergo.com



Vasant Varpe

# आखाती देशातून परत आल्यानंतरचे जीवन: परतणाऱ्या भारतीय कामगारांची समस्या

**- दिलीप परांजपे**



आशा आणि त्यागावर उभारलेला प्रवास. कारण हा प्रवास फक्त भौगोलिक नसतो-तो भावनिक, सामाजिक आणि मानसिक पातळीवरही खोल परिणाम करणारा असतो. गेल्या अनेक दशकांपासून हजारो भारतीय कामगार रोजीरोटीसाठी आखाती देशांकडे स्थलांतर करत आहेत. आपल्या गावाची माती, कुटुंबाचा सहवास, सण-उत्सवांचा आनंद आणि जिव्हाळ्याची नाती मागे ठेवून ते एका स्वप्नासाठी घराबाहेर पडतात-कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्याच्या स्वप्नासाठी. या प्रवासामागे ऐषआरामाची हाव नसून जबाबदारीची तीव्र जाणीव असते. माझ्या कष्टांनी घर चाललं पाहिजे, हीच त्यांची खरी प्रेरणा असते. मात्र या आशेच्या मागे दडलेली वास्तवाची कठोरता अनेकदा दुर्लक्षित राहते. परदेशात जाण्याचा निर्णय जितका धैर्याचा असतो, तितकाच तो वेदनांनी भरलेला असतो. कारण हा प्रवास केवळ भौगोलिक मर्यादित नसून तो भावनिक, सामाजिक आणि मानसिक पातळीवर खोलवर परिणाम करणारा ठरतो, ज्याची किंमत हे कामगार आयुष्यभर चुकवत राहतात.

**आखाती देशांतील जीवन : कष्ट, एकटेपणा आणि जगण्याची धडपड**

आखाती देशांतील कामगारांचे आयुष्य बहुतांश वेळा लेबर कॅम्पसपुरतेच मर्यादित राहते. प्रचंड उष्णता, प्रदीर्घ आणि कष्टदायक कामाचे तास, सततचा शारीरिक थकवा आणि अपुरी विश्रांती-हेच त्यांचे रोजचे वास्तव असते. दिवसागणिक जीवन म्हणजे केवळ काम, जेवण आणि झोप यांची एकसुरी, यांत्रिक साखळी बनून जाते. भावनांना, आनंदाला किंवा स्वतःसाठी वेळ देण्याला फारशी जागाच राहत नाही. वर्षानुवर्षे परदेशात राहूनही अनेक कामगार आपल्या गावाला दहा-पंधरा वेळाच भेट देऊ शकतात, तीही काही आठवड्यांसाठी. मुलांची वाढ, त्यांच्या पहिल्या यशापासून अपयशापर्यंतचे क्षण, पालकांचे वाढते वार्धक्य, कुटुंबातील सुख-दुःख..., हे सगळे ते दूरवरूनच अनुभवतात. तरीसुद्धा त्यांच्या घामाच्या पैशातून घरे उभी राहतात, कर्जे फेडली जातात, मुलांचे शिक्षण पूर्ण होते आणि आई-वडिलांचे उपचार होतात. अनेक कुटुंबांचे संपूर्ण आयुष्य या एका व्यक्तीच्या त्यागावर उभे असते. दुर्दैवाने, या साऱ्या प्रक्रियेत त्या कामगाराचा स्वतःचा आराम, आरोग्य आणि भावनिक गरजा कायमच दुर्लक्षित राहतात.

**निवृत्ती स्थैर्य आणि भीती -**

कामाच्या अखेरच्या दोन-तीन वर्षांत अनेक कामगारांच्या मनात एक वेगळीच भीती हळूहळू घर करू लागते. वर्षानुवर्षे नियमितपणे येणारा पैसा लवकरच थांबणार आहे, हे वास्तव अधिक तीव्रपणे जाणवू लागते. कालपर्यंत जो माणूस घराचा आधारस्तंभ म्हणून ओळखला जात होता, तोच आता स्वतःच्या भूमिकेबाबत साशंक होतो. कुटुंबाची जबाबदारी पेलताना कधीच न थकणारा हा माणूस भविष्यात आपले स्थान काय असेल, याचा विचार करून अस्वस्थ होऊ लागतो. ही भीती केवळ आर्थिक नसते; ती खोलवर भावनिक आणि मानसिक असते. पैसे येणं थांबलं, तर माझं स्थान काय राहील? हा प्रश्न त्याच्या मनात सतत घोळत राहतो. सन्मान, आपलेपणा आणि गरज ही नाती केवळ कमाईवरच आधारित तर नव्हती ना, ही शंका त्याच्या मनाला पोखरू लागते. स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ, कुटुंबातील महत्त्व आणि समाजातील ओळख याबद्दल निर्माण होणारी ही अनिश्चितता त्याला आतून खिळवून टाकते. बाहेरून शांत दिसणारा हा माणूस आतून मात्र भीती, असुरक्षितता आणि एकाकीपणाशी झुंज देत असतो.

**आर्थिक सुरक्षिततेचा भास -**

बाहेरून पाहणाऱ्यांना अनेकदा असे वाटते, इतकी वर्षे परदेशात काम केलं, भरपूर पैसे कमावले, मग आता कसली चिंता? मात्र ही धारणा बहुतांशी वास्तवापासून दूर असते. आखाती देशांत मिळणारी कमाई दिसायला मोठी असली तरी तिचा बहुतांश भाग गरजेच्या खर्चातच संपून जातो. घरबांधणीसाठी घेतलेली कर्जे, मुलांचे शिक्षण, त्यांच्या फी आणि इतर खर्च, आई-वडिलांचे वाढते वैद्यकीय उपचार, तसेच रोजचे कौटुंबिक खर्च-या सगळ्यात कमाईचा मोठा हिस्सा खर्च होतो. खूपच कमी कामगारांकडे निवृत्तीनंतर पुरेल इतकी भक्कम बचत शिल्लक राहते. त्यातही अनेक जण आर्थिक नियोजनाच्या अभावामुळे किंवा योग्य मार्गदर्शन

न मिळाल्याने अडचणीत सापडतात. भविष्यासाठी गुंतवणूक करण्याऐवजी तातडीच्या गरजा भागवण्यातच वर्षे निघून जातात. परिणामी, मायदेशी परतल्यानंतर अपेक्षित असलेले स्थैर्य मिळण्याऐवजी अनिश्चिततेची भावना अधिक तीव्र होते. सुरक्षित भविष्याचे स्वप्न पाहत परदेशात घालवलेली वर्षे, परत आल्यावर मात्र असुरक्षिततेत बदललेली दिसतात.

**नैराश्य, गमावलेली ओळख आणि लपलेले मानसिक संकट -**

घरी परतल्यानंतर अनेक कामगारांना वेगळाच अनुभव येतो. आधी ज्या कुटुंबात त्यांचे मत महत्त्वाचे होते, तिथेच हळूहळू त्यांची भूमिका दुय्यम होते. आर्थिक स्वावलंबन कमी झाले की सन्मानही कमी होतो, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. कमावणारा ते अवलंबून हा बदल मानसिकदृष्ट्या अत्यंत वेदनादायक ठरतो. मित्रमंडळी दूरावलेली असतात, त्यामुळे समाजात आपली ओळख धूसर झाल्यासारखी भासते. या अवस्थेत अनेकजण तीव्र नैराश्याला बळी पडतात. दुर्दैवाने, काही प्रकरणांमध्ये हे संकट इतके असह्य होते की आत्महत्येसारखी टोकाची पावले उचलली जातात..., कधी परदेशातच, तर कधी मायदेशी परतल्यानंतर.

**दुर्लक्षित वास्तव : ज्याकडे डोळेझाक करता येणार नाही**

ही कहाणी ऐकताना काहींना ती अतिशयोक्ती वाटू शकते, परंतु असंख्य आखाती देशांतून परतणाऱ्या कामगारांसाठी हीच रोजची आणि कटू वास्तविकता आहे. ज्यांच्या अथक कष्टांवर कुटुंबांचे संसार उभे राहिले, समाजाला आर्थिक बळ मिळाले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागला, त्यांच्याच भावनिक जखमांकडे मात्र बहुतेक वेळा दुर्लक्ष केले जाते. परतल्यानंतर त्यांच्या वेदना, असुरक्षितता आणि मानसिक संघर्ष कुणालाच दिसत नाहीत किंवा दिसूनही पाहिले जात नाहीत. या कामगारांना केवळ आर्थिक पुनर्वसनाची गरज आहे असे नाही, तर त्याहून अधिक गरज आहे मानसिक आधाराची, मानवी सन्मानाची आणि समाजात पुन्हा सन्मानाने सामावून घेण्याची. त्यांचे अनुभव, त्याग आणि संघर्ष समजून घेणारे कान आणि स्वीकारणारी मने आवश्यक आहेत. त्यांनी दिलेला त्याग केवळ कमाईच्या आकड्यांत मोजता येणार नाही. तो कुटुंबापासून दूर राहिलेल्या वर्षांत, गमावलेल्या क्षणांत आणि न सांगितलेल्या वेदनांत दडलेला आहे. या वास्तवाकडे संवेदनशीलतेने पाहणे ही केवळ सहानुभूती नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे.

**पुढचा मार्ग : कृतज्ञतेकडून कृतीकडे**

आखाती कामगारांचे प्रश्न केवळ वैयक्तिक स्वरूपाचे नाहीत, तर ते संपूर्ण समाजाशी संबंधित आहेत. त्यांच्या कष्टांवर उभ्या राहिलेल्या अनेक कुटुंबांचे आणि अप्रत्यक्षपणे देशाच्या अर्थव्यवस्थेचे ऋण आपण विसरू शकत नाही. त्यामुळे सरकार, समाजसंस्था, कुटुंबे आणि आपण सर्वांनी मिळून या समस्यांकडे गांभीर्याने पाहणे अत्यावश्यक आहे. या कामगारांचे पुनरागमन केवळ विमानतळावर संपत नाही; खरी लढाई त्यानंतर सुरू होते. मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन, नैराश्य ओळखण्यासाठी योग्य यंत्रणा आणि आधार देणारी व्यवस्था उभी राहणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आर्थिक मार्गदर्शन, बचत व गुंतवणुकीचे प्रशिक्षण आणि कौशल्यांनुसार रोजगार पुनर्वसनाच्या संधी उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. स्थानिक पातळीवर स्वयंरोजगार किंवा नव्या नोकऱ्यांसाठी मदत मिळाल्यास त्यांचा आत्मविश्वास पुन्हा उभा राहू शकतो. परंतु या सगळ्यांपेक्षा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे भावनिक स्वीकार. सन्मान, आपुलकी आणि समजूतदारपणा मिळाल्यास हे कामगार स्वतःला समाजाचा भाग असल्याची भावना पुन्हा अनुभवू शकतात. हाच त्यांच्या पुनरागमनाचा खरा आधारस्तंभ ठरू शकतो. प्रश्न इतकाच आहे : त्यांच्या त्यागाची किंमत आपण फक्त आठवणींमध्ये ठेवणार, की प्रत्यक्ष कृतीतून त्यांना सन्मान आणि आधार देणार? प्रश्न इतकाच आहे : त्यांच्या त्यागाची किंमत आपण फक्त आठवणींमध्ये ठेवणार, की प्रत्यक्ष कृतीतून त्यांना सन्मान आणि आधार देणार?

श्री. दिलीप परांजपे यांचा दुबईमध्ये बांधकाम, MEP, फॅसिलिटीज मॅनेजमेंट या क्षेत्रात काम करण्याचा ३५ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी अनेक सामाजिक उपक्रमामध्ये हिरीरीने भाग घेऊन आपले बहुमूल्य योगदान दिले आहे. सध्या ते मुंबई येथे वास्तव्यास आहेत. (Mobile- ९००४३६६३१२)

# माझे परदेशी दौरे

**- डॉ. के. सी. मोहिते, प्राचार्य, सी. टी. बोरा महाविद्यालय, शिरूर**



गेल्या सुमारे ३०-३५ वर्षांच्या माझ्या शिक्षण, संशोधन व प्रशासकीय कारकिर्दीत मला अनेक वेळा परदेश दौऱ्यांची संधी मिळाली. या दौऱ्यांमधून माझे संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर करता आले, विविध देशांतील नामवंत शास्त्रज्ञ व शिक्षणतज्ज्ञांशी संवाद साधता आला आणि शैक्षणिक प्रशासक म्हणून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा अनुभव मिळाला. अमेरिका, फ्रान्स, जपान, चीन, दक्षिण आफ्रिका, ओमान आणि संयुक्त अरब अमिराती अशा विविध देशांना भेट देण्याचा योग आला. या सर्व अनुभवांनी माझे व्यावसायिक जीवन विस्तारलेच, पण वैयक्तिक जीवनही समृद्ध केले.

**⁎ पहिला परदेश दौरा : अमेरिका (२००१) -**

माझा पहिला परदेश दौरा २००१ साली अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील सॅन डिएगो येथे झाला. इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन मेटलर्जिकल कोटिंग्स अँड थिन फिल्म्स (ICMCTF) या आंतरराष्ट्रीय परिषदेत माझा शोधनिबंध सादर करण्यासाठी मी अमेरिकेला गेलो होतो. त्या वेळी मी पीएच.डी. करत होतो आणि प्रवासासाठी मला शिष्यवृत्ती मिळाली होती.

आयुष्यातील पहिलाच विमानप्रवास आणि तोही अमेरिकेसारख्या महासत्तेत-हा अनुभव अत्यंत रोमांचक आणि भावनिक होता. विमान आकाशात झेपावत असताना गाव, शहर आणि देशाची आठवण येत होती, तर विज्ञानातील अनेक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवात उतरल्यासारख्या वाटत होत्या.

लॉस एंजेलिस विमानतळावरील औपचारिकता पूर्ण करून सॅन डिएगोला पोहोचल्यानंतर अनेक भारतीय संशोधक व जुने सहकारी भेटल्यामुळे आत्मविश्वास वाढला. परिषदेदरम्यान जगभरातून आलेल्या शास्त्रज्ञांशी तसेच कॅलिफोर्नियाच्या शिक्षण मंत्र्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यांच्या साधेपणाने मला विशेष प्रभावित केले. या पहिल्याच परदेश दौऱ्यामुळे जागतिक स्तरावर काम करण्याचा आत्मविश्वास मिळाला आणि पुढील आंतरराष्ट्रीय वाटचालीची पायाभरणी झाली.

**⁎ फ्रान्स : संशोधन आणि सामाजिक जाणिवा (२००३)-**

२००३ साली मला फ्रान्समधील लिओन शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी संशोधन पेपर सादर करण्याचे आमंत्रण मिळाले. यासाठीही मला शिष्यवृत्ती मिळाली, त्यामुळे प्रवासाचा खर्च सहजपणे भागवता आला. या परिषदेमुळे माझे शैक्षणिक जाळे विस्तारले आणि माझ्या विषयातील नव्या घडामोडींची माहिती मिळाली.

यानंतर मला क्लनी येथील ENSM² या आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रात दोन आठवडे संशोधन करण्याची संधी मिळाली. या कामाचा माझ्या पीएच.डी. संशोधनाला मोठा फायदा झाला. त्या काळात मी तेथील शेतकरी आणि उद्योजक यांच्याशी संवाद साधला. फ्रान्समधील शेतकरी आपल्या पिकावर प्रक्रिया करून तो माल बाजारात विकतो, तर भारतात आणि महाराष्ट्रात अनेक शेतकरी प्रक्रिया न करता कच्चा माल विकतात, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागे राहतात-हा फरक प्रकर्षाने जाणवला.

या दौऱ्यादरम्यान पॅरिस, लिओन आणि क्लनी या शहरांचे सौंदर्य तसेच फ्रान्सची समृद्ध संस्कृती जवळून अनुभवता आली.

**⁎ संयुक्त अरब अमिराती : शैक्षणिक प्रशासनाचा अनुभव -**

संयुक्त अरब अमिरातीतील रस अल खैमा येथे पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू झाले होते. तेथे संचालक म्हणून कार्य करण्याची

संधी मला मिळाली. त्यामुळे दुबई, अबुधाबी, रस अल खैमा, शारजा, फुजेराह आणि अजमान या ठिकाणी शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामासाठी वारंवार जाण्याचा योग आला. याच काळात डॉ. संदीप कडवे यांच्याशी ओळख झाली. त्यांनी मला परिसंवादामध्ये व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले. पुढे ही ओळख घट्ट मैत्रीत बदलली आणि शैक्षणिक व औद्योगिक सहकार्याचा मार्ग खुला झाला.

*** चीन : प्रगत संशोधनाचा परिचय (२०१४) -**

२०१४ साली चीनला दिलेली भेट माझ्या आंतरराष्ट्रीय प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. शांघाय या अत्यंत प्रगत शहरातील फुदान विद्यापीठ आणि शांघाय विद्यापीठ यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांमध्ये संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. भारत आणि चीन या दोन्ही देशांतील संसाधने, संशोधन पद्धती आणि विकासाच्या वाटा यांची तुलना करता आली. चीनमध्ये सुरू असलेल्या अत्याधुनिक संशोधनाची सखोल माहिती मिळाली, जी पुढील शैक्षणिक वाटचालीस उपयुक्त ठरली.

*** जपान : स्वप्नपूर्तीचा क्षण (२०१३) -**

जपान-'उगवत्या सूर्याचा देश'-आधुनिकता आणि परंपरेचा सुरेख संगम आहे. १९९० साली ओसाका येथे होणाऱ्या एका परिषदेसाठी माझी निवड झाली होती; मात्र आर्थिक सहाय्य न मिळाल्यामुळे ते स्वप्न अपूर्ण राहिले.

सुदैवाने २०१३ साली जपानला जाण्याचा योग आला. आमचे मित्र डॉ. पंकज कोईनकर टोकुशिमा विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अधिष्ठाता असताना सामंजस्य करारासंबंधीचा प्रस्ताव त्यांच्या माध्यमातून पुढे आला. सामंजस्य करार समितीचा अध्यक्ष म्हणून आवश्यक सुधारणा करून मी त्यास शिफारस केली.

या करारांतर्गत मला तसेच डॉ. सुरेश गोसावी, प्राचार्य डॉ. आनंद भालेराव, प्राचार्य देशपांडे आणि प्रा. महाजन यांना २०१३ साली टोकुशिमा विद्यापीठात आयोजित परिषदेसाठी आमंत्रित करण्यात आले. तेथे माझे व्याख्यान झाले आणि विविध संस्थांना भेटी देता आल्या. जपानची शिस्तबद्ध जीवनशैली, प्रगत तंत्रज्ञान, लोकसंस्कृती, नैसर्गिक सौंदर्य आणि शांतताप्रिय वृत्ती जवळून अनुभवता आली.

*** दक्षिण आफ्रिका : विचार, संघर्ष आणि प्रेरणा -**

महात्मा गांधींनी आपल्या आयुष्यातील २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत घालवली. सत्याग्रह आणि अहिंसेची बीजे येथेच रोवली गेली. त्यामुळे दक्षिण आफ्रिका हा देश माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिला आहे.

२०१४, २०१५ आणि २०२५ अशा तीन वेळा मला दक्षिण आफ्रिकेला जाण्याचा योग आला. आसाममधील शिबसागर महाविद्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत व्याख्यान देताना युनिसा विद्यापीठाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. विजया श्रीनिवासु यांच्याशी ओळख झाली. पुढे ही ओळख दृढ शैक्षणिक सहकार्यामध्ये बदलली.

२०१४ साली युनिसा विद्यापीठात झालेल्या ब्रिक्स परिषदेत सोलर सेल्समधील नाविन्यपूर्ण संशोधन या विषयावर मला बीजभाषण देण्याचा मान मिळाला. त्यानंतर दोन्ही विद्यापीठांमध्ये सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाली. पुढील काळात हे व्यावसायिक नाते कौटुंबिक जिव्हाळ्यात परिवर्तित झाले.

या दृढ संबंधांमुळे मला जोहान्सबर्ग येथे नव्याने स्थापन होणाऱ्या विद्यापीठात कार्य करण्याची संधी मिळाली. याच दौऱ्यात वेंडा विद्यापीठाला भेट देण्याचा योग आला. आयोजक श्री. थाबेला मुलालो यांच्या आईने त्यांच्या गावी बनवलेले पारंपरिक जेवण हा एक संस्मरणीय अनुभव होता. नांदोनी धरणाच्या काठावरील व्हिलामध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती, जे

निसर्गसौंदर्याने नटलेले होते. ESTC विद्यापीठाने आयोजित भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या संदर्भात उच्च शिक्षणातील आव्हाने आणि संधी या विषयावरील कार्यशाळेत मला प्रमुख वक्ता म्हणून बोलण्याचे सौभाग्य लाभले. या मंचावर शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते आणि उद्योग प्रतिनिधी एकत्र आले होते. हा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा ठरला.

२५ ऑगस्ट २०२५ रोजी जोहान्सबर्ग येथील मंडेला हाऊसमध्ये एक दिवस घालवणे हा अत्यंत भावनिक अनुभव होता. नेल्सन मंडेला यांच्या जीवनकार्याची साक्ष देणाऱ्या या घरात फिरताना स्वातंत्र्य, न्याय आणि मानवी मूल्यांची खोल जाणीव मनात ठसली. जोहान्सबर्ग, वेंडा विद्यापीठ, नांदोनी धरण परिसर आणि ESTC विद्यापीठातील कार्यशाळा हे सर्व अनुभव अविस्मरणीय ठरले. मंडेला हाऊसला दिलेली भेट विशेष भावनिक होती. एकूणच हा दक्षिण आफ्रिकेचा दौरा केवळ प्रवास न राहता, शैक्षणिक सहकार्य, मानवी संबंध आणि प्रेरणांचा अविस्मरणीय अनुभव ठरला. या आंतरराष्ट्रीय अनुभवांनी मला माझे संशोधन सादर करणे, इतरांकडून शिकणे आणि दीर्घकालीन संबंध निर्माण करणे शक्य झाले आहे. जागतिक संशोधन समुदायाचे महत्त्व आणि ज्ञान आणि नवकल्पना वाढवण्यात सहकार्याचे महत्त्व समजून घेतले आहे.

**निष्कर्ष -**

या सर्व आंतरराष्ट्रीय अनुभवांमुळे मला माझे संशोधन जागतिक व्यासपीठावर मांडता आले, विविध संस्कृती समजून घेता आल्या आणि दीर्घकालीन शैक्षणिक संबंध निर्माण करता आले. ज्ञान, संशोधन आणि नवकल्पना वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव या प्रवासातून अधिक दृढ झाली आहे. या संधींसाठी मी कृतज्ञ आहे आणि भविष्यातही जागतिक शैक्षणिक समुदायाला योगदान देण्यासाठी उत्सुक आहे.



**Dr. K. C. Mohite, Dr. Pankaj Koinkar, Prof. Suresh Gosavi, Vice Chancellor of SPPU with Hon'ble President of Tokushima University and other authorities For collaborative program at Tokushima University, Japan**

# प्रवासी भारतीय दिवस - इतिहास और आजका स्वरुप

प्रवासी भारतीय दिवस भारत सरकार द्वारा प्रवासी भारतीय समुदाय के योगदान को सम्मानित करने के लिए मनाया जाता है। यह ९ जनवरी को आयोजित होता है, जो महात्मा गांधी के १९१५ में दक्षिण अफ्रीका से भारत लौटने की तारीख से जुड़ा है।

**इतिहास -**

इसकी शुरुआत २00३ में तत्कालीन प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी द्वारा की गई, जो लक्ष्मीमल सिंघवी की समिति की सिफारिशों पर आधारित थी। पहले सम्मेलन नई दिल्ली में हुए, और तब से द्विवार्षिक रूप से विभिन्न शहरों में आयोजित हो रहे हैं। उद्देश्य प्रवासियों को भारत से जोड़ना और उनके अनुभव साझा करना रहा है।

**वर्तमान स्वरूप -**

यह अब वार्षिक सम्मेलन के रूप में विकसित हो चुका है, जिसमें युवा कार्यक्रम, पुरस्कार वितरण और थीम-आधारित सत्र शामिल होते हैं। २०२५ का १८वां सम्मेलन ८-१० जनवरी को भुवनेश्वर, ओडिशा में विकसित भारत में प्रवासी भारतीयों का योगदान थीम पर हुआ। प्रधानमंत्री ने इसमें प्रवासी भारतीय एक्सप्रेस को हरी झंडी दिखाई और पुरस्कार दिए। २०२६ का प्रवासी भारतीय दिवस (पीबीडी) सम्मेलन अभी आधिकारिक रूप से घोषित नहीं किया गया है।

प्रवासी भारतीय दिवस (PBD) के प्रमुख उद्देश्य प्रवासी भारतीयों के योगदान को मान्यता देना और उन्हें भारत से जोड़ना हैं। यह समुदाय के अनुभवों का आदान-प्रदान, भारत के विकास में उनकी भागीदारी बढ़ाना तथा संबंध मजबूत करना सुनिश्चित करता है।

**मुख्य उद्देश्य -**

- प्रवासी भारतीय समुदाय द्वारा भारत के विकास में दिए योगदान की सराहना करना।
- प्रवासियों को भारत की नीतियों से अवगत कराना और निवेश के अवसर प्रदान करना।
- सांस्कृतिक व भावनात्मक संबंधों को मजबूत करना तथा ज्ञान साझा करना।

**प्रमुख विषय -**

विभिन्न संस्करणों में विषय बदलते रहे हैं, जैसे २०२३ में प्रवासी भारतीय और विकासित भारत का विजन तथा २०२५ में विकसित भारत में प्रवासी भारतीयों का योगदान। ये थीम प्रवासियों की भूमिका, डायस्पोरा की एकता तथा वैश्विक सहयोग पर केंद्रित रहते हैं।


*My best wishes to*
***NRIs and 'Vishwa Panthastha' !***



**Er. Satish Deshmukh**
President Forum of Intellectuals

*My best wishes to*
***NRIs and 'Vishwa Panthastha' !***

SHARE CROPPERS PRIVATE LIMITED






**Sanjay Khatri**

INCUBATE PARTNERS
MENTORING * INCUBATION * GROWTH
SUSTAINABILITY * FUNDING

We are a management consulting company providing tailored solutions to clients across the world and across multiple business and industry domains. Innovation, Incubation, Investment, Building Businesses, Expansion and Transform or Turnaround is the roadmap we follow for sustainable growth.

**Consulting Services**

1. Mentoring and Incubation, Funding Strategy.
2. Management, Investment and Technology Consulting
3. Training Needs Analysis, Structuring and delivering training solutions, HR Solutions, Head Hunting and Recruitment.
4. Market Research and Techno Economic Feasibility Studies, Mystery Shopping
5. Process and Business Reviews, Root Cause Analysis, Efficiency Audits, Sustainability Solutions
6. Board Advisory & Representation, CEO Coaching & Counseling, Team & Capacity Building, Vision Strategy Workshops.
7. Career Counseling, Career Mapping over ten years.
8. Investor support for due diligence of deal pipelines, building deal pipelines, review and restructuring of existing business and investment portfolio, exit strategies.
9. Buy Side and Sell Side Investment engagements, drafting and review of contracts.
10. Business set up, growth, compliance, legal issues, advice on litigations and arbitrations.
11. Business diversification and expansion strategies, including M&A, turnarounds.

All our solutions are sector and region agnostic.

**Contact Us**
**Dr Sandeep Kadwe** Mentor and Managing Partner, Incubate Partners, Pune
Mobile: +91 834 933 1708 Email: mentor@in3bet.com Website: www.in3bet.com


Vishwa Panthastha CR No. MAHBIL/2018/69261
हिंदवी डेव्हलपर्स
निमित्त
वृंदावन पार्क
कमर्शियल व रेसिडेन्शिअल प्लॉट
955 251 0111
वाडेबोल्हाई-केसनंद रोड, गट नं. 82, ता. हवेली, जि. पुणे